ePaper

## मनसेसोबतच्या युतीचा निर्णय लवकरच; उद्धव ठाकरेंचं मोठं वक्तव्य

| वर्ष - 9 | अंक -27 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत

- पाकिस्तानने सुपर फोर फेरी गाठली
- स्मृती मनधनाचं विक्रमी वेगवान शतक
- केरळमध्ये मेंदू खाणाऱ्या अमीबाचा कहर!
- वडनगर स्थानकात नवा चहाचा स्टॉल!


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 18 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

शिवसैनिक आक्रमक | मीनाताई ठाकरे पुतळा विटंबना प्रकरण

# पुतळ्यावर लाल रंग फेकणाऱ्याला अटक!




## पुतळ्यावर लाल रंग फेकल्याने परिसरात खळबळ

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**मुंबईतील शिवाजी पार्क येथील मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग फेकण्याची घटना समोर आली होती. या प्रकरणी पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे हा व्यक्ती ठाकरेंच्या कार्यकर्त्याचा चुलत भाऊ असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. उपेंद्र गुणाजी पावसकर असं आरोपीचे नाव असल्याचेही समोर आले आहे.**

मीनाताई ठाकरे या बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी आणि उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री आहेत. त्यामुळे शिवसैनिक त्यांना आदराने माँ साहेब म्हणतात. मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग फेकल्यामुळे शिवसैनिक आक्रमक झाले होते.





आता या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. या आरोपीने गुन्हा कबूल केला असल्याचेही सुत्रांनी सांगितले आहे. संपत्तीच्या वादात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे हस्तक्षेप करत असल्याचा आरोप पावसकर याने केला आहे अशी माहिती सुत्रांनी दिली आहे.

### उद्धव ठाकरे काय म्हणाले?

या घटनेवर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले होते की, 'आजचा प्रकार अत्यंत निंदनीय होता. ज्याला स्वत:च्या आई-वडिलांची नाव घ्यायला शरम वाटते, त्याने हे केलं असावं. महाराष्ट्र पेटवण्याचा हा प्रयत्न असू शकतो. पोलीस या सगळ्या गोष्टीचा शोध घेत आहेत. बघू पुढे काय होतं. पोलीस म्हणतात की, आम्ही शोधून काढू. दोन प्रकारच्या व्यक्ती यामागे असू शकतात, ज्यांना स्वत:च्या आई-वडिलांच नाव घ्यायला लाज वाटते, शरम वाटते अशा लावारिस व्यक्तीने हे केलं असावं.'

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग टाकण्यात आल्याच्या प्रकरणावर प्रश्न विचारला होता. यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, 'अशाप्रकारची घटना ही निषेधार्य आहे. ज्या कुठल्या समाज कंटकांनी हे कृत्य केलं आहे, त्याला पोलिस शोधून काढतील आणि त्याच्यावर कारवाई करतील. यापेक्षा जास्त याला राजकीय रंग देणं मला योग्य वाटत नाही.'

### आरोपीला पोलीस शोधून काढतील आणि...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी याबाबत प्रश्न विचारला होता. यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, 'अशाप्रकारची घटना ही निषेधार्य आहे. ज्या कुठल्या समाज कंटकांनी हे कृत्य केलं आहे, त्याला पोलिस शोधून काढतील आणि त्याच्यावर कारवाई करतील. यापेक्षा जास्त याला राजकीय रंग देणं मला योग्य वाटत नाही.'

### परिसरात बंदोबस्त वाढवला

आज पहाटे दादरच्या शिवाजी पार्क येथे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आई मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर अज्ञात व्यक्तींनी लाल रंग फेकला होता. या घटनेचा शिवसैनिकांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे शिवाजी पार्क परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. काही वेळापूर्वी येथे फॉरेंसिक एक्सपर्टची टीम दाखल झाली होती. त्यांनी फेकलेल्या रंगाचे 5 सँपल गोळा करण्याचं काम सुरू केलं आहे.

### एकनाथ शिंदेंची प्रतिक्रिया

मी स्वत: पोलिसांशी बोललो आहे, आणि ज्याने कोणी हे केलं आहे, खरं म्हणजे हा खूप दुर्दैवी प्रकार आहे. या घटनेची जेवढी निंदा करावी, जेवढा निषेध करावा तेवढा थोडा आहे. पोलिसांना सूचना दिल्या आहेत, ज्याने कोणी हा प्रकार केला असेल त्याला तातडीनं अटक करावं, त्याच्यावर कठोर कारवाई करावी असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

## आरोपीचा धक्का खुलासा

पोलिसांनी अटक केल्यानंतर आरोपीने जबाबात धक्कादायक माहिती दिली. संपत्तीच्या वादात उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे हस्तक्षेप करत असल्याचा आरोप आरोपीने केलाय. दादर पोलीस ठाण्यात श्रीधर पावसकर आणि आदित्य ठाकरे यांच्याविरोधात तक्रार देण्यासाठी सातत्याने यायचे, अशी सूत्रांची माहिती आहे. आता आरोपीचा जबाब नोंदवल्यानंतर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## नेमकं काय घडलं?

प्रबोधनकार ठाकरेंच्या जयंतीनिमित्त ठाकरेंचे कार्यकर्ते छत्रपती शिवाजी पार्क परिसरात आले होते. त्यावेळी मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर लाल रंग फेकल्याचं कार्यकर्त्यांना दिसलं, कार्यकर्त्यांकडून पुतळ्याची स्वच्छता करण्यात आली. लाल रंग नेमका कोणी टाकला याचा आता पोलिसांकडून शोध सुरू आहे. त्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते आणि पदाधिकाऱ्यांकडून देखील पुतळा परिसरात पहाणी करण्यात आली. दरम्यान सध्या या परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, कायदा -सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, म्हणून स्थानिक शिवसैनिक देखील घटनास्थळी हजर आहेत.

## सुप्रिया सुळे यांची मागणी | शेतकऱ्यांना देण्यात आलेला कर्जमाफीचा शब्द पाळावा

# ओला दुष्काळ जाहीर करून कर्जमाफी द्या!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात गेल्या चार महिन्यांपासून पाऊस पडत आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते. केंद्र आणि राज्य सरकारने या परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्जमाफी देत ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.**

## प्रसारमाध्यमांशी संवाद साधला



पुणे महापालिकेत येत असलेल्या आणि बारामती लोकसभा मतदारसंघात समावेश असलेल्या वारजे, कात्रज, चांदणी चौक, धायरी या भागातील उड्डाणपूल तसेच नागरिकांना भेडसावणारे प्रश्न जाणून घेण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी या भागात पाहणी केली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. या पाहणी दौऱ्यात खासदार सुळे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ओला दुष्काळ जाहीर करण्याबरोबरच निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना देण्यात आलेला कर्जमाफीचा शब्द पाळावा, अशी मागणी सुळे यांनी केली. सुळे म्हणाल्या, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडेच सहकार मंत्रालयाची जबाबदारी आहे. गेल्या महिन्यांत त्यांची भेट घेतली. त्यावेळी गेल्या चार महिन्यांपासून राज्यात सतत पाऊस पडत आहे. राज्यातील काही भागात ढगफुटी सदृश्य पडलेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे. राज्यातील शेतऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी महाविकास आघाडी सरकारची मागणी आहे.विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्र्यासह दोन्ही विद्यमान उपमुख्यमंत्र्यांनी निवडून आल्यानंतर कर्जमाफी करण्याची घोषणा केली होती. दिलेला शब्द राज्यात सत्ताधारी असलेल्या महायुती सरकारने सरसकट कर्जमाफी देऊन पाळावा आणि ओला दुष्काळ जाहीर करावा, असे खासदार सुळे म्हणाले.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन महिन्यांनी पुढे जात असल्याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी नाराजी व्यक्त केली. त्या म्हणाल्या,'पंचायतराज हा गाभा आहे.

सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. मात्र, या सर्व गोष्टी सत्ताधाऱ्यांना मोडीत काढायच्या आहेत. त्यामुळेच निवडणूक पुढे ढकलली जात आहे.' 'राज्यात महायुतीचे सरकार आहे. ते व्यवस्थित काम करत आहे ना? मग असे का घडत आहे,' असा सवाल खासदार सुळे यांनी केला.'शहराचा विकास ज्या पद्धतीने होणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे होत नाही. शहरात वाहतुकीचा प्रश्न अत्यंत गंभीर होत चालला आहे. हिंजवडी येथील आयटी पार्क परिसरातील प्रश्नासाठी दर पंधरा दिवसांनी बैठक घेतली जाते. मात्र त्यानंतरही प्रश्न सुटत नाही. प्रशासनाने जे निर्णय घेतले पाहिजे, ते घेतले जात नाहीत. येथील वाहतूक कोंडी सुटत नाही, रस्त्यांची अवस्था बिकट आहे. हे राज्य सरकारचे अपयश आहे. नगर नियोजनामध्ये विस्कळतीपणा आला आहे. याकडे राज्यकर्ते गांर्भीयाने पाहत नाहीत,' असेही खासदार सुळे म्हणाल्या.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देणाऱ्या जाहिरातींमध्ये केवळ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे छायाचित्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. यावर बोलताना खासदार सुळे म्हणाल्या, 'यामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली की, फक्त उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पंतप्रधान मोदी यांना नेता मानले आहे. बाकीचे कोणी त्यांचे छायाचित्र लावत नाहीत, याची नोंद घेतली पाहिजे.' 'काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहिरात सर्वत्र देण्यात आली होती. ही जाहिरात नक्की कोणी दिली, याचा संदर्भ लागत नाही.' असेही खासदार सुळे म्हणाल्या. पुणे महापालिकेत येत असलेल्या आणि बारामती लोकसभा मतदारसंघात समावेश असलेल्या वारजे, कात्रज, चांदणी चौक, धायरी या भागातील उड्डाणपूल तसेच नागरिकांना भेडसावणारे प्रश्न जाणून घेण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी या भागात पाहणी केली.

### शेतऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. या पाहणी दौऱ्यात खासदार सुळे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ओला दुष्काळ जाहीर करण्याबरोबरच निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना देण्यात आलेला कर्जमाफीचा शब्द पाळावा, अशी मागणी सुळे यांनी केली.सुळे म्हणाल्या, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडेच सहकार मंत्रालयाची जबाबदारी आहे. गेल्या महिन्यांत त्यांची भेट घेतली.

# दोन जातींच्या उपसमित्यांची गरज होती का?

## ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा राज्य सरकारला सवाल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'राज्य सरकारने आरक्षणाबाबत मराठा आणि ओबीसी जातींच्या नेमलेल्या दोन उपसमित्यांची गरज होती का,' असा सवाल ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला. 'या विषयात राजकारण न करता सामाजिक ऐक्य आणि सर्वांनी एकत्र येऊन कटुता कमी कशी करता येईल, हे पाहिले पाहिजे,' अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.**




मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना शरद पवार म्हणाले, 'राज्य सरकाने दोन जातींच्या उपसमित्या नेमल्या आहेत. त्यामध्ये एकजण दुसऱ्याचा विचार करणार नाही. असे करण्याची आणि दोन वेगवेगळ्या उपसमित्या नेमण्याची गरज होती का?'राज्यातील सामाजिक वातावरण बिघडत आहे. बंजारा समाजाने मोर्चा काढल्यानंतर दुसऱ्या दिवशी आदिवासी समाजाचा मोर्चा झाला. त्यामुळे या विषयात राजकारण न करता सामाजिक ऐक्य साधण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच सर्वांनी एकत्र येऊन कटुता कमी कशी करता येईल, हे पाहणे गरजेचे आहे,' असे पवार म्हणाले. हैदराबाद गॅझेटविषयी शरद पवार म्हणाले, 'हे गॅझेट कधीच वाचले नव्हते. तो भाग महाराष्ट्रात नव्हता. त्याच्या खोलात आम्ही कधी गेलो नाही. आता प्रत्येक जातीची वेगळी मागणी असेल, तर ऐक्य कसे होईल?'अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. सोलापूरमध्ये यापूर्वी रस्त्यांवरून पाणी वाहत असल्याचे कधीही पाहिले किंवा ऐकले नव्हते. लोणी काळभोरमध्येही घरांमध्ये पाणी गेले. राज्यात ऊस आणि अन्य पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी ताबडतोब नुकसानीचे पंचनामे सुरू करावेत.

### नुकसानीचे पंचनामे सुरू करा

केंद्र आणि राज्य सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी,' असेही पवार म्हणाले.अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यात येत असल्याबाबत विचारणा करण्यात आली असता पवार म्हणाले, 'राज्य सरकारने तेथील राज्य सरकारशी याबाबत चर्चा केली पाहिजे. अलमट्टी धरणाची उंची वाढवल्यास सोलापूर आणि कोल्हापूर भागात भयंकर स्थिती निर्माण होईल.

## आरोग्य शिबिरे, तपासण्या आणि जनजागृती उपक्रम
## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये

# ‘स्वस्थनारी, सशक्तपरिवार’ अभियान राबविणार!

## महिलांच्या व बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार मार्फत “स्वस्थ नारी, सशक्त परिवार” हे विशेष राष्ट्रीय नुकतेच सुरु करण्यात आले.या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालये व दवाखान्यात विविध आरोग्य शिबिरे, तपासण्या आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.**






या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून, नागरिकांना या सर्व सेवांचा व्यापक लाभ मिळावा यासाठी वैद्यकीय विभागाच्या वतीने विशेष नियोजन केले आहे. सदर अभियानाचा शुभारंभ महानगरपालिके मार्फत सन्माननीय लोक सभा सदस्य , विधानपरिषद सदस्य, विधानसभा सदस्य तसेच आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्या हस्ते तालेरा रुग्णालय, कै. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, नवीन भोसरी रुग्णालय व कै. ह.भ.प. मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय, आकुर्डी येथे करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ही शिबिरे पालिकेच्या आठही रुग्णालयात तसेच ३१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात व नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र येथे २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आयोजित करण्यात आलेली आहेत.

या अभियानात रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, क्षयरोग, ॲनिमिया तपासणी, महिलांची तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, पोषण समुपदेशन, लसीकरण, किशोरींसाठी मासिक पाळी व पोषणावरील सत्रे, समुपदेशन, रक्तदान दिनानिमित्त रक्त संकलनाचे लक्ष्य, आयुष्मान वय वंदना कार्ड वितरण, क्षयरुग्णांना पोषण आहारासाठी दत्तक घेण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे.

> “महिला आणि बालकांच्या आरोग्याची काळजी घेणे म्हणजे संपूर्ण समाजाच्या आरोग्याचे संरक्षण केल्यासारखे आहे. या अभियानाद्वारे तज्ज्ञ सेवा आणि व्यापक जनजागृती करून समाजातील महिला व बालकांना निरोगी करण्याचे शासनाचे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उद्दिष्ट आहे.”
> **-शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> “महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. सदरचे अभियान महिलांच्या व बालकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने एक महत्वाचे पाउल आहे.या अभियानामुळे महिलांच्या व बालकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यात महत्वाची मदत होईल.”
> **— डॉ. लक्ष्मण गोफणे,**
> आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

# अन् त्यांच्या काळजाचा ठोका चुकला...!

## वाकडच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये अग्निशमन विभागाची मॉक ड्रिल

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**‘दुपारी साडेअकरा वाजता अचानक हॉटेलच्या लॉबीत धूर पसरू लागला. अग्निबजावणीच्या सूचना सुरू झाल्या, काही क्षणातच सायरनचा आवाज कानठळ्या बसवू लागला... पाहता पाहता कर्मचाऱ्यांनी पाहुण्यांना बाहेर काढायला सुरुवात केली, आणि उपस्थितांचे काळजाचे ठोके क्षणभरासाठी थांबले. पण ही कुठलीही खरी आग नव्हती. तर ही होती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाने आयोजित केलेली मॉक ड्रिल.**




रहाटणी उपअग्निशमन केंद्राच्या वतीने वाकडमधील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये ही मॉक ड्रिल पार पडली. शहरातील वाढत्या उंच इमारती व गर्दीच्या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत काय करावे, याचा सराव करून देण्यासाठी हा प्रयोग करण्यात आला होता.

या मॉक ड्रिलमध्ये धुराने भरलेल्या भागातून सुटका, अग्निशामक सिलिंडरचा योग्य वापर, लिफ्ट न वापरता जिन्यांचा वापर, तसेच आपत्तीच्या क्षणी शांत राहून तात्काळ निर्णय घेण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. हॉटेलमधील कर्मचारी, व्यवस्थापन आणि पाहुण्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला.

सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सरावात प्रभारी उपअग्निशमन अधिकारी विजय घुगे, उपअग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांच्यासह अग्निशमन दलाचे अधिकारी, जवान आणि शिकाऊ कर्मचारी सहभागी झाले होते. उमेश ढाकणे यांनी सांगितले की, “अग्निदुर्घटना कधीही, कुठेही होऊ शकते. अशा वेळी वेळ वाचवून घेतलेली कृतीच जीव वाचवते. मॉक ड्रिलद्वारे आम्ही केवळ सराव घडवत नाही, तर मानसिक तयारीही करून देतो.” प्रभारी अधिकारी विजय घुगे म्हणाले, “या सरावामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. आपत्ती व्यवस्थापनात त्वरित निर्णय घेणे व घाबरून न जाता कृती करणे, हेच यशस्वी टप्पे आहेत.”



## भूमिका

**महाराष्ट्र शासनाने २०१५ साली महाराष्ट्र प्रवेश व शुल्क नियंत्रण अधिनियम हा कायदा अधिनियमित करून व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश व शुल्क या दोन्ही बाबींमध्ये पारदर्शकता आणि शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. या कायद्याअंतर्गत प्रवेश नियामक प्राधिकरण आणि शुल्क नियामक प्राधिकरण ही महत्त्वाची प्राधिकरणे स्थापन करण्यात आली. मात्र त्यानंतरही परिस्थिती जैसे थेच राहिल्याचे दिसते.**

# प्राधिकरण नेमले, शुल्क नियमन कधी?



शुल्क नियामक प्राधिकरण हे एक स्वतंत्र कायदेशीर प्राधिकरण असून त्याचे प्रमुख काम विद्यार्थ्यांकडून संस्थांनी घेतलेले शुल्क वाजवी आहे का याची तपासणी करणे, हे आहे. या प्राधिकरणाचे अध्यक्षपद सामान्यपणे उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती किंवा मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे असते. त्याबरोबरच प्राधिकरणात शिक्षणतज्ज्ञ, अनुभवी सनदी लेखापाल अथवा वित्ततज्ज्ञ असतात. विशेष म्हणजे कोणतीही व्यक्ती जर खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेशी थेट संबंधित असेल तर ती या प्राधिकरणाची सदस्य होऊ शकत नाही.संस्थांनी सादर केलेल्या शुल्क प्रस्तावांची तपासणी करून मंजुरी देणे, नफा कमावण्यावर किंवा देणगी शुल्कावर (कॅपिटेशन फी) नियंत्रण ठेवणे, मंजूर शुल्कापेक्षा जास्त रक्कम घेतल्यास ती विद्यार्थ्यांना परत मिळवून देणे, तक्रार निवारणासाठी व्यवस्था ठेवणे, आणि गरज पडल्यास संस्थांच्या पायाभूत सुविधा तपासणे इत्यादी जबाबदाऱ्या या प्राधिकरणाने पार पाडणे अपेक्षित असते.प्रत्येक संस्थेला दरवर्षी ३१ ऑक्टोबरपर्यंत आपल्या मागील वर्षाच्या लेखापरीक्षित खात्यांसह पुढील वर्षाचे अंदाजपत्रक या प्राधिकरणाकडे सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी स्वतंत्र छाननी विभाग ठेवला जातो. प्राप्त कागदपत्रांची तपासणी करून १२० दिवसांच्या आत शुल्क निश्चित करून जाहीर करणे हे या प्राधिकरणाचे काम आहे. एकदा शुल्क मंजूर झाले की ते संपूर्ण अभ्यासक्रमासाठी बंधनकारक असते. दरम्यानच्या काळात ते बदलता येत नाही. केवळ करांमध्ये बदल झाला किंवा अनपेक्षित मोठा खर्च आला तर या प्राधिकरणाच्या परवानगीने शुल्कात सुधारणा करता येते. संस्थांना मंजूर केलेले शुल्क त्यांच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर मराठीत व इंग्रजीत प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. भाषिक अल्पसंख्याक संस्थांनी ती माहिती आपल्या भाषेतही देणे आवश्यक आहे.प्राधिकरणाकडून काही निकषांवर वाजवी शुल्क ठरवले जाते. त्यात संस्थेचे स्थान, जमीन व इमारतीचा खर्च, आवश्यक पायाभूत सुविधा, शिक्षक व कर्मचाऱ्यांचे पगार, प्रशासकीय व देखभाल खर्च आणि शैक्षणिक उत्पन्नाच्या जास्तीत जास्त १५ टक्के एवढा विकासासाठी अधिशेष. या नियमांचा हेतू म्हणजे संस्थांनी शिक्षणाच्या नावाखाली अतिरेकी नफा मिळवू नये आणि विद्यार्थ्यांवर अन्यायकारक आर्थिक भार पडू देऊ नये.या दोन्ही प्राधिकरणांना नागरी न्यायालयासमान अधिकार देण्यात आले आहेत. त्यांना साक्षीदारांना समन्स पाठवणे, पुरावे मागवणे, शपथपत्र स्वीकारणे यासारखी कामे करण्याची ताकद आहे. जर एखाद्या संस्थेने मंजूर शुल्कापेक्षा जास्त रक्कम घेतली, खोटी माहिती दिली, बनावट लेखे सादर केले, तर पहिल्या किंवा नंतरच्या गुन्ह्यासाठी एक ते दहा लाख किंवा जास्त शुल्क घेतले असल्यास त्याच्या दुप्पट दंड आकारला जाऊ शकतो. तसेच, गंभीर उल्लंघन झाल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याची शिफारसही करता येते. कोणत्याही शिक्षणसंस्थेने चुकीची माहिती किंवा बनावट कागदपत्र सादर करणे हे गुन्हेगारी कृत्य असून त्यासाठी सहा महिन्यांपर्यंत तुरुंगवासाची तरतूद आहे.याच पार्श्वभूमीवर, औषधनिर्माणशास्त्राच्या अभ्यासक्रमांबाबत एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आला आहे. राज्य सरकारने २०२३-२४ आणि २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये नवी दिल्ली येथील भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद या राष्ट्रीय परिषदेच्या मानकांनुसार तपासण्या करण्याचे आदेश दिले. या तपासणीत अनेक संस्थांमध्ये मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव आढळून आला. शासनाने घेतलेल्या आढावा बैठकीतून हे स्पष्ट झाले.

## प्रासंगिक »

### वडापाव संस्कृती!

***मुंबई मराठी साहित्य संघाच्या निवडणुकीत लोढांनी रस घ्यावा काय हा त्यांचा प्रश्न; पण महाराष्ट्रास जडलेल्या गंभीर आजाराकडे आता तरी लक्ष जायला हवे...***

‘गिरगावचा साहित्य संघ मराठी राहणार का?’ असा प्रश्न ‘लोकसत्ता’ने रविवारच्या अंकात विचारला. त्यास पार्श्वभूमी आहे ती संघाच्या सध्या सुरू असलेल्या निवडणुकांची. या निवडणुकीत विख्यात बांधकाम व्यावसायिक मंगलप्रभात लोढा हे सक्रिय असल्याचे दिसून आले. वास्तविक कोणी कशात किती रस घ्यावा हा ज्याचा त्याचा प्रश्न असला तरी कोण कशात कधी आणि मुख्य म्हणजे कोणत्या उद्देशाने रस घेतो हे पाहणे महत्त्वाचे असते.की ज्यांचे सांस्कृतिक योगदान आवर्जून लक्षात घ्यावे. मराठी संगीत रंगभूमी, या रंगभूमीवरील कलाकार, त्यांचे चांगभले यांत हिराचंद यांस रस होता आणि ते अशा कार्यक्रमांस साध्या रसिकाच्या भूमिकेतून आवर्जून हजेरी लावत. परंतु वाङ्ग्यीन परिसंवाद, मराठी नाट्यसृष्टीसमोरील आव्हाने इत्यादी.

कधी काळी “हम दो, हमारे दो” ही घोषणा भारताच्या कुटुंबसंस्थेचे प्रतीक मानली जात होती. दोन मुलं, पालकांची स्थिर नोकरी आणि सुरक्षित भविष्य हा आदर्श जीवनाचा आराखडा होता. वेगाने प्रगत होणारे तंत्रज्ञान आणि जागतिक पातळीवरील स्पर्धा यामुळे आता कुटुंब रचनेचा नवा ट्रेंड दिसू लागला आहे.

# ‘जेन झी’ म्हणते ‘हम दो, हमारे हम’

हम दो, हमारा एक’ किंवा ‘हम दो, हमारे हम’ म्हणजे एकच अपत्य, कधी कधी अजिबात अपत्य न होऊ देणे किंवा आवश्यक असल्यास दत्तक घेणे हे जेन झी पिढीमध्ये स्थिरावू लागले आहे.भारतात लोकसंख्या वाढ नेहमीच जास्त असल्याचे चित्र होते. परंतु अलीकडील जनगणना आणि सर्वेक्षण वेगळे वास्तव सांगतात. २०२५ च्या आकडेवारीनुसार भारताचा जननदर (टोटल फर्टिलिटी रेट) १.९ पर्यंत खाली आला आहे, जो रिप्लेसमेंट रेट म्हणजे दोन मुलांसाठी आवश्यक असलेल्या २.१ या दरापेक्षा कमी आहे. याचा अर्थ असा की, भारतीय समाज आपोआप लहान कुटुंबाच्या (न्यूक्लीयर फॅमिली) दिशेने गेला आहे. ग्रामीण भागातील जननदरदेखील २.१ वर घसरला आहे आणि शहरी भागात तो आणखी कमी आहे. काही राज्यांमध्ये ही घसरण खूप वेगवान आहे. गुजरातमध्ये गेल्या दहा वर्षांत जन्मदर २४ टक्क्यांनी कमी झाला आहे, तर नागपूरसारख्या शहरी भागात फक्त दोन वर्षांत ५६ टक्क्यांनी घट झाली




आहे. संयुक्त राष्ट्रांच्या पॉप्युलेशन फंडच्या अहवालातही भारताची लोकसंख्या आता हळूहळू स्थिर होईल आणि २०५० नंतर घटण्याची शक्यता आहे, असे स्पष्ट नमूद केले आहे.जेन झी पिढी म्हणजे १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली तरुण पिढी. ही पिढी जगाकडे वास्तववादी नजरेने पाहते.

शिक्षण घेऊन चांगली नोकरी मिळवणे हे आज फार कठीण झाले आहे. बेरोजगारी दर सतत वाढतो आहे, चांगल्या दर्जाच्या नोकऱ्या कमी होत आहेत आणि मिळणाऱ्या नोकऱ्यांमध्ये पगार अपेक्षेपेक्षा खूपच कमी आहे. या परिस्थितीत जेन झी स्वतःला प्रश्न विचारते की, ‘मी माझ्या मुलांना सुरक्षित भविष्य देऊ शकेन का?’ आणि उत्तर शोधताना ते बहुतेक वेळा एकच अपत्य असणे, अजिबात अपत्य न नसणे किंवा दत्तक घेणे याकडे झुकत आहे. त्यांच्यासाठी हा निर्णय केवळ वैयक्तिक नाही तर सामाजिक जबाबदारीचा भाग बनला आहे.मिलेनियल पिढी, म्हणजे १९८१ ते १९९६ दरम्यान जन्मलेली पिढी, जिने पारंपरिक धाटणीने दोन अपत्यांची कुटुंब संरचना स्वीकारली आहे.

पण आज त्यांना त्याचा ताण जाणवत आहे. शिक्षणाचा खर्च दरवर्षी दहा ते बारा टक्क्यांनी वाढतो आहे. खासगी शाळांमध्ये शिक्षण परवडण्यासारखे उरलेले नाही. उच्च शिक्षणासाठी भारतात खाजगी विद्यापीठांत पदवी मिळवण्यासाठी आठ ते १५ लाख रुपयांचा खर्च येतो, तर परदेशात जाण्याचा खर्च कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचतो. पालकांच्या पगाराच्या तुलनेत हा खर्च प्रचंड आहे, त्यामुळे ते बचतीतून किंवा कर्जातून हा खर्च भागवतात. दुसरीकडे, मुलांना चांगल्या नोकऱ्या मिळत नसल्यामुळे पालकांच्या मनात त्यांच्या भविष्यासंबंधी असुरक्षितता निर्माण होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## फडणवीस यांचा दावा ‘मुख्यमंत्री समृद्ध अभियाना’ चा राज्यस्तरीय शुभारंभ

# बहिणींना बिनव्याजी एक लाख कर्ज!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना बिनव्याजी एक लाख रुपयांचे कर्ज देऊन त्यांना शासन आर्थिक पाठबळ देईल. त्यातून उद्योग व्यवसाय करून त्या स्वावलंबी होतील. राज्यातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी करण्याचा संकल्प असल्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.**

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना’ चा राज्यस्तरीय शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किनगाव (ता. फुलंब्री) येथे झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत

### बँकांमार्फत १ लाख बिनव्याजी कर्ज

‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ राबविले जाणार आहे. फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे योजनांची अंमलबजावणी करून लाभ देण्याचे अभियान तर आहेच, मात्र, हे प्रत्येक ग्रामस्थाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे अभियान आहे. लोकसहभाग या अभियानाचा मूळ गाभा आहे. आमच्या लाडक्या बहिणी यांना केवळ १५०० रुपयांवर अवलंबून रहावे लागू नये, त्यांना महिला बचत गटांच्या माध्यमातून उद्योग व्यवसायासाठी अर्थसहाय्य देऊन लाडक्या बहिणींना सक्षम करण्यात येईल. प्रत्येक गावात लाडक्या बहिणींची एक पतसंस्था सुरू करून जिल्हा बँकेमार्फत त्यांना एक लाख रुपयाचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून त्यांच्या पाठीशी शासन उभे राहील, असे फडणवीस म्हणाले.स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या ग्रामपंचायतींना तब्बल २५० कोटी रुपयांचे पारितोषिके दिली जाणार आहेत. इतकी पारितोषिके



देणारी ही देशातील पहिलीच योजना असल्याचा दावा या वेळी करण्यात आला. या अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना तालुकास्तरावर प्रथम १५ लाख, द्वितीय १२ लाख आणि तृतीय ८ लाख, जिल्हास्तरावर प्रथम ५० लाख, द्वितीय ३० लाख आणि तृतीय २० लाख तर राज्यस्तरावर प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी आणि तृतीय २ कोटी रुपयांची बक्षिसे मिळणार आहेत.महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना’ चा राज्यस्तरीय शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किनगाव (ता. फुलंब्री) येथे झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ राबविले जाणार आहे. फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे योजनांची अंमलबजावणी करून लाभ देण्याचे अभियान तर आहेच, मात्र, हे प्रत्येक ग्रामस्थाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे अभियान आहे. लोकसहभाग या अभियानाचा

### २५० कोटींची पारितोषिके

१७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’ राबविले जाणार आहे.फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे योजनांची अंमलबजावणी करून लाभ देण्याचे अभियान तर आहेच, मात्र, हे प्रत्येक ग्रामस्थाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे अभियान आहे. लोकसहभाग या अभियानाचा मूळ गाभा आहे. आमच्या लाडक्या बहिणी यांना केवळ १५०० रुपयांवर अवलंबून रहावे लागू नये.

मूळ गाभा आहे. आमच्या लाडक्या बहिणी यांना केवळ १५०० रुपयांवर अवलंबून रहावे लागू नये, त्यांना महिला बचत गटांच्या माध्यमातून उद्योग व्यवसायासाठी अर्थसहाय्य देऊन लाडक्या बहिणींना सक्षम करण्यात येईल. प्रत्येक गावात लाडक्या बहिणींची एक पतसंस्था सुरू करून जिल्हा बँकेमार्फत त्यांना एक लाख रुपयाचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून त्यांच्या पाठीशी शासन उभे राहील, असे फडणवीस म्हणाले.स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या ग्रामपंचायतींना तब्बल २५० कोटी रुपयांचे पारितोषिके दिली जाणार आहेत. इतकी पारितोषिके देणारी ही देशातील पहिलीच योजना असल्याचा दावा या वेळी करण्यात आला. या अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना तालुकास्तरावर प्रथम १५ लाख, द्वितीय १२ लाख आणि तृतीय ८ लाख, जिल्हास्तरावर प्रथम ५० लाख, द्वितीय ३० लाख आणि तृतीय २० लाख तर राज्यस्तरावर प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी आणि तृतीय २ कोटी रुपयांची बक्षिसे मिळणार आहेत.महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना’ चा राज्यस्तरीय शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किनगाव (ता. फुलंब्री) येथे झाला. यांचा वाढदिवस आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

---

# आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडण्याची शक्यता

## होमिओपॅथी डॉक्टरांचा संप! आयएमएसह मार्डही सहभागी होणार

।सातारा।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीचा सराव करण्यास राज्य सरकारने दिलेल्या परवानगीविरोधात गुरूवारी डॉक्टरांनी संप पुकारला असून इंडियन मेडिकल असोसिएशन आणि महाराष्ट्र सिनियर रेसिडेंट डॉक्टर असोसिएशनने या दोन संघटनाही संपावर जाणार असल्याने राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



सीसीएमपी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथीचा सराव करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात राज्यातील डॉक्टरांनी दंड थोपटले आहेत. आयएमएने १८ सप्टेंबर रोजी पुकारलेल्या संपामध्ये राज्यातील सरकारी रुग्णालयातील एमएसआरडीए या डॉक्टरांच्या संघटनेने सहभागी होण्याचा निर्णय घेतला होता.

त्यापाठोपाठ आता केंद्रीय मार्ड आणि बीएमसी मार्डने सुद्धा या संपामध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मुंबईतील जे.जे. रुग्णालय, केईएम, शीव, नायर आणि कूपर रुग्णालयातील आरोग्यसेवा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. कायद्यानुसार राज्य सरकारचा निर्णय हा पूर्णपणे चुकीचा आहे. या दोन्ही व्यवसायासाठीचे शिक्षण, प्रवेश परीक्षा वेगळ्या आहेत.

### अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात येणार

डॉक्टरांप्रमाणे समान दर्जा देणे चुकीचे असून त्याचा निषेध करण्यासाठी राज्यातील सर्व सरकारी रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी या आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. संप काळात सरकारी रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बंद ठेवण्यात येणार आहेत.मात्र रुग्णसेवा फारशी बाधित होऊ नये यासाठी अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात येणार आहेत. राज्य सरकारने यासंदर्भात तातडीने निर्णय न घेतल्यास त्याविरोधात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय मार्डचे राज्य प्रवक्ता डॉक्टर अर्थव शिंदे यांनी दिली. यामुळे १८ सप्टेंबर रोजी राज्यातील रुग्णसेवा बाधित होऊन आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अमीबा'चा कहर

## केरळमध्ये 'मेंदू खाणाऱ्या अमीबा'ने १९ जणांचा मृत्यू

# केरळमध्ये मेंदू खाणाऱ्या अमीबाचा कहर!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळमध्ये 'मेंदू खाणाऱ्या अमीबा'चा कहर पाहायला मिळत आहे. या मेंदू खाणाऱ्या अमीबाच्या संसर्गामुळे आतापर्यंत केरळमध्ये तब्बल १९ रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या संसर्गाच्या अनुषंगाने आता केरळच्या आरोग्य विभागाकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. मेंदू खाणारा अमीबा अर्थात नेग्लेरिया फॉवलेरी नावाच्या अमीबाच्या हल्ल्यामुळे प्रायमरी अमीबिक मेनिंगोएन्सेफलायटीस हा संसर्ग होतो.**

## १९ रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती



या संसर्गाच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे केरळच्या आरोग्य मंत्र्यांनी याची दखल घेत आढावा घेतला आहे. केरळच्या आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांनी म्हटलं की, "केरळ गंभीर आरोग्य आव्हानाचा सामना करत आहे. याआधी कोझिकोड आणि मलप्पुरम सारख्या जिल्ह्यांमधील वेगवेगळ्या क्लस्टर्सशी संबंधित संसर्ग नोंदवण्यात आला होता. मात्र, आता संपूर्ण राज्यभरात अनेक प्रकरणे समोर आले आहेत. या आजाराचा संसर्ग झालेल्या रुग्णांमध्ये ३ महिन्यांच्या बाळापासून ते ९१ वर्षांच्या व्यक्तीपर्यंतच्या रुग्णांचा समावेश आहे." या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.हा संसर्ग झाल्यानंतर सुरुवातीच्या टप्प्यात डोकेदुखी, ताप, मळमळ व उलट्या, अशी लक्षणे दिसून येतात. तसेच मान ताठ होणे, फिट येणे, गोंधळ उडणे, भास होणे यांचा समावेश असू शकतो. गंभीर प्रकरणांमध्ये संक्रमित व्यक्ती कोमात जाऊ शकते आणि मृत्यू होऊ शकतो. यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अॅण्ड प्रिव्हेंशनने (CDC) दिलेल्या माहितीनुसार, PAM चा संसर्ग झालेले बहुतांश रुग्ण लक्षणे सुरू झाल्यापासून एक ते अठरा दिवसांत मृत्युमुखी पडतात. सहसा पहिले पाच दिवस कोमा आणि नंतर मृत्यू होण्याची शक्यता सर्वाधिक असते.मेंदू खाणारा अमीबा अर्थात नेग्लेरिया फॉवलेरी नावाच्या अमीबाच्या हल्ल्यामुळे प्रायमरी अमीबिक मेनिंगोएन्सेफलायटिस (PRIMARY AMEBIC MENINGOENCEPHALITIS PAM) हा संसर्ग होतो. हा मेंदूच्या संसर्गाचा दुर्मीळ आजार आहे. नेग्लेरिया फॉवलेरी हा एकपेशीय सजीव असून, तो डोळ्यांना दिसत नाही. सूक्ष्मदर्शकाखाली त्याचे अस्तित्व दिसून येऊ शकते. हा अमीबा जगभरात कुठेही तलाव, नद्या, जलतरण तलाव, गरम पाण्याचे झरे यांसारख्या गोड्या पाण्यात, तसेच मातीमध्येही आढळतो.

तो शरीरात फक्त नाकावाटे प्रवेश करून मेंदूपर्यंत जाऊ शकतो. ११५°F (४६°C)पर्यंतचे उच्च तापमान त्याच्या वाढीसाठी अनुकूल असते. तो उबदार वातावरणात अल्प काळ टिकू शकतो. खराब नद्यांमध्ये अथवा जलतरण तलावाची अवस्था आणि देखभाल खराब असेल, तर तिथे हा अमीबा आढळू शकतो.या संसर्गाच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे केरळच्या आरोग्य मंत्र्यांनी याची दखल घेत आढावा घेतला आहे. केरळच्या आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांनी म्हटलं की, "केरळ गंभीर आरोग्य आव्हानाचा सामना करत आहे. याआधी कोझिकोड आणि मलप्पुरम सारख्या जिल्ह्यांमधील वेगवेगळ्या क्लस्टर्सशी संबंधित संसर्ग नोंदवण्यात आला होता. मात्र, आता संपूर्ण राज्यभरात अनेक प्रकरणे समोर आले आहेत. या आजाराचा संसर्ग झालेल्या रुग्णांमध्ये ३ महिन्यांच्या बाळापासून ते ९१ वर्षांच्या व्यक्तीपर्यंतच्या रुग्णांचा समावेश आहे." या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.हा संसर्ग झाल्यानंतर सुरुवातीच्या टप्प्यात डोकेदुखी, ताप, मळमळ व उलट्या, अशी लक्षणे दिसून येतात. तसेच मान ताठ होणे, फिट येणे, गोंधळ उडणे, भास होणे यांचा समावेश असू शकतो. गंभीर प्रकरणांमध्ये संक्रमित व्यक्ती कोमात जाऊ शकते आणि मृत्यू होऊ शकतो. यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अॅण्ड प्रिव्हेंशनने (CDC) दिलेल्या माहितीनुसार, PAM चा संसर्ग झालेले बहुतांश रुग्ण लक्षणे सुरू झाल्यापासून एक ते अठरा दिवसांत मृत्युमुखी पडतात. सहसा पहिले पाच दिवस कोमा आणि नंतर मृत्यू होण्याची शक्यता सर्वाधिक असते.

### डोळ्यांनाही दिसत नाही

नेग्लेरिया फॉवलेरी नावाच्या अमीबाच्या हल्ल्यामुळे प्रायमरी अमीबिक मेनिंगोएन्सेफलायटिसहा संसर्ग होतो. हा मेंदूच्या संसर्गाचा दुर्मीळ आजार आहे. नेग्लेरिया फॉवलेरी हा एकपेशीय सजीव असून, तो डोळ्यांना दिसत नाही. सूक्ष्मदर्शकाखाली त्याचे अस्तित्व दिसून येऊ शकते. हा अमीबा जगभरात कुठेही तलाव, नद्या, जलतरण तलाव, गरम पाण्याचे झरे यांसारख्या गोड्या पाण्यात, तसेच मातीमध्येही आढळतो.

# वडनगर स्थानकात नवा चहाचा स्टॉल!

## पंतप्रधान मोदी यांनी या स्थानकात चहाची विक्री केली होती

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन लिमिटेडने (आयआरसीटीसी) गुजरातमधील वडनगर रेल्वे स्थानकात नवीन आधुनिक फूड प्लाझा सुरू केला आहे. हा फूड प्लाझा चहा या संकल्पनेवर आधारित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी बालपणी वडनगर रेल्वे स्थानकात चहा विक्री करीत होते.**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म १७ सप्टेंबर १९५० रोजी गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील वडनगर या गावी झाला. मोदी कुटुंबियांची आर्थिक परिस्थिती अतिशय सामान्य होती. उपजीविकेसाठी त्यांचे वडील वडनगर रेल्वे स्थानकावर चहा विकत होते.

नरेंद्र मोदी लहानपणी वडिलांना वडनगर रेल्वे स्थानकात चहा विकण्यास मदत करीत होते, असे बोलले जाआधुनिक फूड प्लाझा सुरू केला आहे.बालपणी वडनगर रेल्वे स्थानकात वडिलांसोबत चहा विकल्याचे लोकसभेच्या २०२४ च्या निवडणुकीपूर्वी नरेंद्र मोदी यांनी अनेक वेळा सांगितले होते. वडनगर रेल्वे स्थानकात एक छोटी चहाची टपरी आहे. तिथून मोदी यांचा बालपणीचा जीवन प्रवास सुरू झाला.

आयआरसीटीसीने मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून वडनगर रेल्वे स्थानकात आधुनिक फूड प्लाझा सुरू केला आहे संजय कुमार जैन यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा आणि उत्कृष्ट सेवा पुरवण्यासाठी आयआरसीटीसी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत आहे.

### आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रीमियम चहा

३८३ चौ.मी. क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या या फूड प्लाझामध्ये ५२ आसनांची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्लाझाची रचना खास चहा या संकल्पनेवर आधारित आहे. येथे प्रवाशांना आवडता पारंपरिक कटिंग चहा, तसेच जॅस्मिन, अर्ल ग्रे, आणि ग्रीन टी सारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रीमियम चहाचे प्रकार चाखता येतील.

# अर्चना पूरन सिंहचे आमिर खानबद्दल मोठे वक्तव्य

मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे आमिर खान. अनेकदा तो चर्चेत असतो. आता अर्चना पूरन सिंह यांनी त्याच्याविषयी केलेल्या वक्तव्यामुळे अभिनेत्याची चर्चा होताना दिसत आहे.अर्चना पूरन सिंहने नुकतीच 'बॉलीवूड बबल'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत 'राजा हिंदूस्तानी' या चित्रपटातील 'तेरे इश्क में नाचेंगे' या गाण्याच्या शूटिंगवेळी आमिर खानने खरंच मद्यप्राशन केले होते का, असा प्रश्न विचारला होता. यावर उत्तर देताना अर्चना पूरन सिंहने म्हटले, "मी याबद्दल ऐकले आहे. आमचे जिथे शूटिंग सुरू होते, तिथे त्याची रूम माझ्या रूमच्या बाजूलाच होती. त्याने माझ्यासमोर कधीही मद्यप्राशन केले नाही, पण मला वाटते की त्याने त्या गाण्यासाठी मद्यप्राशनाचा प्रयोग केला असावा. पण, तो त्याच्या या प्रयोगाबद्दल खूश नव्हता."'राजा हिंदूस्तानी' चित्रपटाबद्दल अर्चना पूरन सिंहने म्हटले, "हा चित्रपट माझ्यासाठी खास होता. कारण या चित्रपटातील माझ्या



भूमिकेसाठी मला फिल्मफेअर अवॉर्डमध्ये नॉमिनेशन मिळाले होते. या एकाच भूमिकेसाठी मला नॉमिनेशन मिळाले होते. नाहीतर मी कोणतेही पुरस्कार जिंकले नाहीत. जेव्हा परमित माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला की, नॉमिनेशन हे देखील पुरस्कार जिंकल्यासारखे असते. त्यावेळी मला जाणीव झाली की मला पुरस्कार मिळणार नाही, पण तरीही पुरस्कार मिळाल्यासारखे वाटत होते."अर्चना पूरन सिंह 'द ग्रेट इंडियन कपिल शो'मध्ये दिसणार आहे. हा विनोदी कार्यक्रम १३ भागांचा असणार आहे. 'द ग्रेट इंडियन कपिल शो'चा दुसरा सीझन २१ सप्टेंबरपासून प्रदर्शित होणार आहे. नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर हा शो पाहायला मिळणार आहे. दरम्यान, १९९६ साली प्रदर्शित झालेल्या 'राजा हिंदूस्तानी' या चित्रपटाने धुमाकूळ घातला होता. आजही या चित्रपटाचा मोठा चाहतावर्ग असल्याचे पाहायला मिळते. एका लहानशा खेड्यातील टॅक्सी ड्रायव्हर एका श्रीमंत मुलीच्या प्रेमात पडतो. त्यांच्यात असलेला फरक विसरून हे जोडपे कसे एकत्र येते, अशा आशयाची ही कथा आहे. या चित्रपटात आमिर खान, करिश्मा कपूर, अर्चना पूरन सिंह, जॉनी लिवर, मोहनीश बहल हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसले होते. अर्चना या चित्रपटात नकारात्मक भूमिकेत दिसली होती.

## "लॉरेन्स बिश्नोई को भेजूं क्या?"

बॉलिवूडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या कुटुंबाला बिश्नोई टोळीने पुन्हा एकदा धमकावण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी सलमानचे वडील, ज्येष्ठ पटकथा लेखक व अभिनेते सलीम खान यांना धमकी मिळाली आहे. सलीम खान घराजवळच्या उद्यानात बसलेले एक इसम व बुरखा परिधान केलेली महिला स्कूटरवरून त्यांच्या जवळ गेले. यावेळी महिलेने सलीम खान यांना लॉरेन्श बिश्नोई टोळीच्या नावाने धमकी दिली.सलीम खान हे नेहमीप्रमाणे बुधवारी सकाळी देखील मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडले होते. या स्कूटरवर एक इसम व त्याच्या मागे एक बुरखा परिधान केलेली महिला बसली होती. या स्कूटरने यू टर्न घेतला आणि चालक ती स्टूकर घेऊन सलीम खान यांच्याजवळ गेला.

## जनाईच्या लूकनं वेधलं लक्ष

प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी अनेक हिट चित्रपटांमधील गाणी गायली आहेत. अशा भोसले यांना 'मेलोडी क्वीन' असंही म्हटलं जातं. आशा भोसले या त्यांच्या गाण्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकतात. त्या अनेक कार्यक्रमांना देखील हजेरी लावतात. नुकत्याच आशा भोसले या त्यांच्या नातीसोबत एका कार्यक्रमामध्ये स्पॉट झाल्या. यावेळी अनेक पापाराझींनी त्यांचे फोटो काढले. आशा भोसले यांच्यासोबत त्यांची नात जनाई भोसले हिचे देखील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. जनाईच्या सौंदर्यानं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओमध्ये जनाई ही मोकळे केस, साडी आणि मोत्यांचे गळ्यातले अशा लूकमध्ये दिसत आहे. तर आशा भोसले या ऑफ व्हाइट कलरची साडी आणि मोत्यांची ज्वेलरी अशा लूकमध्ये दिसत आहेत. जनाई आणि आशा भोसले यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन जनाईच्या सौंदर्याचं कौतुक केलं आहे. जनाई ही आशा भोसले यांचा मुलगा आनंद भोसले यांची मुलगी आहे. जनाई ही तिच्या आजीप्रमाणेच गायिका आहे.ती सोशल मीडियावर तिचे विविध फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते.



## अरिजितने मन जिंकली

गायक अरिजित सिंह आपल्या आवाजाने चाहत्यांना मंत्रमुग्ध करतो. एखादा नवा सिनेमा यावा आणि त्यात अरिजितचे गाणे असावे, याची चाहते वाट बघतात. अनेक श्रोते अरिजितची जुनी हिट गाणी वेगवेगळ्या शैलीत ऐकण्यासाठी त्याच्या कॉन्सर्टला हजेरी लावतात. या कॉन्सर्टमध्ये अरिजित कधी जोडप्यांनी सांगितलेली गाणी गातो, तर आपल्या साध्या वागण्यातून, कृतीतून गातानाच चाहत्यांची मने जिंकतो. नुकत्याच एका कॉन्सर्टमध्ये अरिजितने एका चाहत्याने व्यासपीठावर ठेवलेले जेवण उचलून त्याच्या टीममधील व्यक्तीच्या हाती देत माफी मागितली. हा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, चाहते अरिजितचे कौतुक करत आहेत. अरिजित सिंह कॉन्सर्टच्या निमित्ताने वर्ल्ड टूर करत आहे. यात नुकताच त्याचा एक कॉन्सर्ट झाला. या कॉन्सर्टमध्ये अरिजित सिंहने 'ऐ दिल है मुश्किल' सिनेमाचे टायटल ट्रॅक गाताना त्याने केलेल्या कृतीने चाहत्यांची मने जिंकली.'ऐ दिल है मुश्किल' या गाण्यातील "मुझे आजमाती है तेरी जमीं" ही ओळ गात असताना, एक व्यक्ती त्याच्या जेवणाचा बॉक्स व्यासपीठावर अरिजितच्या पायाजवळ ठेवतो. ते पाहिल्यावर अरिजित ते जेवण उचलतो आणि तिथे असणाऱ्या त्याच्या टीममधील व्यक्तीकडे सुपूर्द करतो. यानंतर गाणं गातानाच अरिजित त्या चाहत्याची माफी मागतो. असा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर फिरतोय.

## 'सर्व लोक आपला पाठलाग का करत आहेत?

अभिनेत्री करीना कपूर खानने तिच्या विविध भूमिकांमुळे चाहत्यांच्या मनावर छाप सोडली आहे. करीनाच्या उत्तम अभिनयामुळे 'जब वी मेट'मधील 'गीत', 'चमेली', 'कभी खुशी कभी गम'मधील 'पू'(पूजा) या भूमिका चाहत्यांच्या नेहमी लक्षात राहिल्या आहेत. करीनाला बॉलीवूडमध्ये ट्रेंडसेटर म्हणूनसुद्धा ओळखले जाते. झिरो फिगर ते फॅशनमधील अनेक ट्रेंड तिने बॉलीवूडमध्ये आणले. करीनाला यावर्षी बॉलीवूडमध्ये २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. याच पार्श्वभूमीवर तिच्या विविधांगी भूमिका असलेले चित्रपट सिनेमागृहात दाखवले जाणार असून, तिच्याच नावाने चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.नुकतेच करीनाला तिच्याच सिनेमांच्या चित्रपट महोत्सवाच्या एका कार्यक्रमात "तुमच्या नावाने सिनेमहोत्सव सुरू होणार आहे, याची तैमूरला कल्पना आहे का?" हा प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना करीना म्हणाली की, तो अजून खूप लहान आहे, त्यामुळे त्याला याबाबत तशी कमी माहिती आणि समज आहे. जेव्हा पापाराझी आमच्या मागे येतात, त्यावरून त्याला थोडी कल्पना असेल.करीनाच्या नावाने सिनेमहोत्सव २० सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. या महोत्सवाच्या एका कार्यक्रमात करीना म्हणाली की, "तैमूर आणि मी जेव्हा एकत्र असतो, तेव्हा पापाराझी आमचा पाठलाग करतात. तेव्हा तैमूर म्हणतो, 'सर्व लोक आपला पाठलाग का करत आहेत? मी लोकप्रिय आहे का?' त्यावर करीना तैमूरला म्हणाली की, 'तू नाही, मी लोकप्रिय



सुपर फोर फेरी गाठली

## पाकिस्तानला जिंकताना त्यांना संघर्ष करावा लागला

# पाकिस्तानने सुपर फोर फेरी गाठली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बहिष्काराचं अस्त्र परजून म्यान केलेल्या पाकिस्तानने युएईविरुद्ध खेळायचं ठरवलं. मात्र अनुनभवी संघाविरुद्ध जिंकताना त्यांना संघर्ष करावा लागला. युएईने नाणेफेक जिंकून फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारताविरुद्धच्या सामन्यातल्या चुका कायम राखत पाकिस्तानने हाराकिरी केली. फखर झमान आणि शाहीन शहा आफ्रिदी यांच्या महत्त्वपूर्ण खेळींमुळे १४६ धावांची मजल मारता आली. युएईने सुरुवात चांगली केली पण त्यानंतर नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. पाकिस्तानने ४१ धावांनी सामना जिंकत सुपर फोर फेरी गाठली आहे.**

युएईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. आक्रमक खेळीसाठी ओळखला जाणारा सईम अय्युब भोपळाही न फोडता तंबूत परतला. तिसऱ्या षटकात साहिबजादा फरहानही बाद झाला. कर्णधार सलमान अघाकडून मोठ्या खेळीची अपेक्षा

### अय्युब भोपळाही न फोडता तंबूत



होती. पण तो २० धावा करुन तंबूत परतला. फखर झमान आणि सलमानची भागीदारी डाव सावरणार असं चित्र होतं मात्र सलमान बाद झाला. सिमरनजीत सिंगने हसन नवाझला तंबूत धाडलं. खुशदिल अवघ्या ४ धावा करून माघारी परतला. फखरने एका बाजूने किल्ला लढवत ३६ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ५० धावांची खेळी केली. विकेटकीपर फलंदाज मोहम्मद हॅरिसने फखरला साथ दिली. त्याने १४ चेंडूत १८ धावा केल्या. जुनैद सिद्दीकीने त्याला बाद केलं. शाहीन शहा आफ्रिदीने या लढतीतही संघाची इभ्रत वाचवली. त्याने १४ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद २९ धावांची खेळी केली. यामुळे पाकिस्तानने १४६ धावांची मजल मारली.युएईला कर्णधार मुहम्मद वासिमकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती पण तो १४ धावा करुन तंबूत परतला. राहुल चोप्राने सर्वाधिक ४० धावांची खेळी केली. ध्रुव पराशरने २० धावा करत त्याला चांगली साथ दिली. हे दोघे बाद होताच युएईच्या विजयाच्या आशा मावळल्या. पाकिस्तानतर्फे शाहीन शहा आफ्रिदी, हारिस रौफ, अबरार अहमद यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.रविवारी झालेल्या भारत-पाकिस्तान लढतीत भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली अघा यांनी नाणेफेकीच्या वेळेस हस्तांदोलन केलं नाही. सामना संपल्यानंतर भारतीय संघाने पाकिस्तानच्या खेळाडूंशी हस्तांदोलन नाकारलं.

### आफ्रिदीने संघाची इभ्रत वाचवली

याउलट त्यांनी जोखमीची परिस्थिती शिताफीने हाताळली. कर्णधारांनी हस्तांदोलन करू नये असा निर्णय संयोजकांनी घेतला आहे हा मुद्दा पायक्रॉफ्ट यांनी दोन्ही संघांच्या कर्णधारांसमोर मांडला. आयत्यावेळी गोंधळ होऊ नये यासाठी पायक्रॉफ्ट यांनी दोन्ही कर्णधारांशी समन्वय साधला. पायक्रॉफ्ट यांच्या विरोधात तक्रार करण्याचा अधिकार पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला आहे.

या प्रकारामुळे नाराज होऊन पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली अघा पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित राहिला नाही. पत्रकार परिषदेला त्याच्याऐवजी प्रशिक्षक माईक हेसन उपस्थित होते. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने हे प्रकरण पुढे रेटत सामनाधिकाऱ्यांना लक्ष्य केलं. पायक्रॉफ्ट यांनी हस्तांदोलन करू नका अशी सूचना दिल्याचा आरोप पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने केला. पायक्रॉफ्ट यांची तातडीने हकालपट्टी करावी अशी मागणी पीसीबीने केली होती. मागणी पूर्ण न झाल्यास उर्वरित सामन्यांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा पाकिस्तानने दिला होता. हस्तांदोलन न करण्याचा मुद्दा पेटला. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी याप्रकरणी सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना लक्ष्य केलं. पायक्रॉफ्ट यांनीच कर्णधारांना हस्तांदोलन न करण्याची सूचना केली होती असा आरोप नक्वी यांनी केला. पायक्रॉफ्ट यांची तातडीने हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी आयसीसीकडे केली. मागण्या पूर्ण न झाल्यास पाकिस्तान युएईविरुद्धच्या लढतीवर बहिष्कार घालण्याचे संकेत दिले होते. मात्र आता हा सामना होत आहे.सामन्याआधी पीसीबीच्या वाटाघाटी बैठकी सुरू असल्यामुळे पाकिस्तानच्या खेळाडूंनी मैदान सोडलं नव्हतं. बहिष्कार न घालण्याचा निर्णय झाल्याने पाकिस्तानचा संघ अखेर रवाना झाला. या प्रकारामुळे सामना तासभर उशिराने सुरू करण्यात आला.अँडी पायक्रॉफ्ट यांनी आयसीसी कोणत्याही नियमाचं उल्लंघन केलेलं नाही.

# स्मृती मानधनाचे विक्रमी वेगवान शतक

## 18 वर्षांनंतर भारतीय संघाने केली ही खास कामगिरी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**स्मृती मन्धानाच्या विक्रमी वेगवान शतकाच्या बळावर भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धचा दुसरा वनडे सामना जिंकला. तब्बल १८ वर्षांनंतर भारतीय संघाने घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामना जिंकण्याची किमया साधली. २००७ मध्ये भारतीय संघाने घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाला नमवलं होतं. स्मृतीच्या तडाखेबंद शतकाच्या बळावर भारतीय संघाने २९२ धावांचा डोंगर उभारला.**



प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलियाला १९० धावाच करता आल्या. भारतीय संघाने १०२ धावांच्या फरकाने हा सामना जिंकला. प्रथम फलंदाजी करत असताना भारतीय क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मन्धानाने मोठा विक्रम केला आहे. मन्धानाने ऑस्ट्रेलियाच्या संघाविरोधात सर्वात वेगवान शतक ठोकण्याचा विक्रम केला आहेराजकोट येथे आयर्लंडविरुद्ध झालेल्या सामन्यात स्मृती मन्धानाने ७० चेंडूत शतक ठोकले होते.चंदीगढ येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात स्मृती मन्धानाने आजच्या सामन्यात ७७ चेंडूत शतक ठोकण्याची किमया साधली. तर एकूण सामन्यात तिने ९१ चेंडूत ११७ धावा केल्या. या खेळीत १४ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. आजच्या शतकानंतर डावखुऱ्या मन्धानाने आपल्या कारकिर्दीतील १२ वे एकदिवसीय शतक पूर्ण केले.आजच्या शतकामुळे स्मृती मन्धानाने अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत.लागोपाठ दुसऱ्या वर्षी तीन किंवा त्यापेक्षा अधिक शतक झळकविण्याचा विक्रम मन्धानाने आपल्या नावावर केला आहे.

### सर्वाधिक शतकांचा विक्रम

महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकविणाऱ्या खेळाडूंच्या यादीत आता संयुक्तपणे मन्धाना तिसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंडची फलंदाज टॅमी ब्यूमोंट (१२ शतके) हीची बरोबरी तिने केली आहे. महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकांचा विक्रम ऑस्ट्रेलियाची माजी कर्णधार मेग लॅनिंग हिच्या नावावर आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।

। दि. 18 सप्टेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त

# पिंपरी-चिंचवड शहरामध्ये रक्तदान!

## अमृत महोत्सव' शिबिर; 275 जणांनी केले रक्तदान



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पिंपरी- चिंचवड भारतीय जनता पार्टीने 'सेवा पंधरवडा' अभियानांतर्गत भव्य रक्तदान 'अमृत महोत्सव' शिबिराचे आयोजन केले होते.**

चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित केलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सकाळी आठ वाजता सुरू झालेल्या या शिबिराचे उद्घाटन शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापु) काटे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य हेमंतराव हरहरे यांच्या हस्ते झाले. या वेळी २७५ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या शिबिराला अनेक मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये आमदार शंकर जगताप,आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिवराव खाडे, माजी महापौर उषाताई ढोरे, जिल्हा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे, आणि वैशालीताई खाडये यांचा समावेश होता.

याव्यतिरिक्त, भाजपा राज्य परिषद सदस्य पाटील चिंचवडे आणि धर्मेंद्र क्षीरसागर, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, माजी उपमहापौर तुषार हिंगे, माजी नगरसेविका उषाताई मुंढे, निर्मलाताई कुटे,आरतीताई चोंधे,अश्विनीताई चिंचवडे, माजी नगरसेवक विनायक गायकवाड,संदीप कस्पटे,विठ्ठल भोईर, बिभीषण चौधरी,मंडल अध्यक्ष अनिताताई वाळुंजकर,शिवराज लांडगे,धरम वाघमारे,मोहन राऊत,शहर पदाधिकारी उपाध्यक्ष राम वाकडकर,अमित पसरणीकर,रवी देशपांडे, कैलास सानप,खंडूदेव कठारे,हेमचंद्र मासुळकर,राजेंद्र बाबर,बापू घोलप, युवराज लांडे, दीपक भोंडवे,अभिजित बोरसे, संजय परळीकर, कविताताई हिंगे, दिपालीताई कलापुरे, आणि प्रीतीताई कामतीकर यांचीही उपस्थिती होती.

या शिबिराच्या आयोजनात भारतीय जैन संघटनेचे प्रकाश गादिया आणि विरेश छाजेड तसेच तेरापंथी युवक परिषदेचे पंकज गादिया यांनीही सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे संयोजक जयदिप खापरे यांनी प्रास्ताविक केले, तर सहसंयोजक नामदेव पवार यांनी सूत्रसंचालन केले आणि विनोद मालू यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

## रिंगरोडच्या मोजणीला तीन गावांचा विरोध कायम

## वारंवार बैठका होऊनही येवलेवाडी, जांभूळवाडी, कदमवाक वस्ती आडकाठी

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) तर्फे रिंग रोडच्या पहिल्या टप्प्यातील मोजणी अंतिम टप्प्यात आली आहे. मात्र, वारंवार चर्चा व बैठका घेऊनही येवलेवाडी, जांभूळवाडी आणि कदमवाक वस्ती या तीन गावांचा विरोध कायम आहे.**



पीएमआरडीएच्या हद्दीतील वडाची वाडी, भिलारेवाडी, पिसोळी, येवलेवाडी, गुजर निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, जांभूळवाडी, आंबेगाव खुर्द, कदमवाक वस्ती, सोळू, निरगुडी, वडगाव शिंदे, म्हाळुंगे या गावांची संयुक्त मोजणी प्रस्तावित होती. त्यापैकी बहुतेक गावांची मोजणी पूर्ण झाली असली तरी या तीन गावांचा प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नाही. दरम्यान, मोजणीचे नकाशे जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाले असून प्रशासनाने संबंधित प्रक्रिया पूर्ण केली आहे. मोजणी पूर्ण झालेल्या गावांमध्ये जमीन संपादनासाठी थेट खरेदीची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू झाली आहे.

राज्य रस्ते विकास महामंडळाने रिंग रोडचे काम सर्वप्रथम हाती घेतले होते. त्यानंतर पीएमआरडीएने त्यांच्या हद्दीतील ८३ किलोमीटर लांबी आणि ६५ मीटर रुंदीचे काम सुरू केले. या प्रकल्पासाठी तब्बल ११५ हेक्टर जागेचे भूसंपादन आवश्यक आहे. सोळू गावापर्यंत रिंग रोडचे काम प्रस्तावित असून तेथील नागरिकांशी चर्चा करून पुढील कार्यवाही होणार आहे.

## शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी - प्रा. राव तुमाला

### 25' आणि चौथ्या 'आयमेस-25' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**दहा पंधरा वर्षांत भारताने विज्ञान - तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने विकास केला आहे. नवकल्पना, निर्मिती, उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा खुबीने वापर केला जात आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत, असे प्रतिपादन मायक्रो इलेक्ट्रॉनिक पॅकिंग इनोव्हेशन्सचे पुरस्कर्ते प्रा. राव तुमाला यांनी केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील शैक्षणिक संकुलातील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे नवव्या 'आयसीसीयुबीईए-२५' आणि चौथ्या 'आयमेस-२५' या दोन आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन करण्यात आले. ही परिषद दोन दिवसांची असून 'संगणन, संप्रेषण, नियंत्रण आणि ऑटोमेशन' तसेच 'यांत्रिक अभियांत्रिकी मधील नवकल्पना' या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सादरीकरण, चर्चा होणार आहे. याप्रसंगी प्रा. तुमाला यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी आयईईईचे पुणे विभागीय प्रमुख डॉ. अमर बुचडे, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे, 'आयसीसीयुबीईए-२५' जनरल चेअर डॉ. जयश्री कट्टी, 'आयमेस-२५'जनरल चेअर डॉ. नरेंद्र देवरे आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समाजाला चांगल्या सेवा मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी नवकल्पना, संशोधनाला चालना मिळावी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संवाद साधला पाहिजे, या हेतूने आयईईई काम करत आहे. पीसीसीओई मध्ये आज होत असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये संगणन, संप्रेषण, ऑटोमेशन तसेच यांत्रिक अभियांत्रिकी'चे विषय निवडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना भविष्यात याचा मोठा फायदा होईल, असे मत डॉ. अमर बुचडे यांनी व्यक्त केले.

या परिषदेसाठी देशासह सोळा देशांमधून बाराशे चाळीस प्रवेशिका आल्या. त्यामधून २१४ शोध निबंधांची निवड करून त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे, असे डॉ. जयश्री कट्टी यांनी सांगितले. 'आयमेस' साठी २६० प्रवेशिकां मधून १२० शोध निबंधांची निवड करण्यात आली, असे डॉ. नरेंद्र देवरे यांनी सांगितले.

डॉ. गोविंद कुलकर्णी म्हणाले, की संशोधकांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देऊन व्यासपीठ मिळवून देण्यासाठी; तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधकांशी ओळख होण्यासाठी ही परिषद उपयुक्त आहे.

यावेळी परिषदे विषयी माहिती असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेसाठी विविध देशांतील प्रतिनिधी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अंजली श्रीवास्तव, डॉ. संदीप पाटील यांनी केले. आभार डॉ. स्वाती जगताप यांनी मानले.


पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करून परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या.

---

# मोहननगर परिसरात वारंवार वीज खंडित

### नागरिक संतप्त; भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**

मोहननगर परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. याविरोधात नागरी हक्क कृती समितीच्या वतीने भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन दिले आहे. महावितरणचा गलथान आणि नियोजनशून्य कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली. मोहननगरमधील वीज प्रश्नाबाबत शिष्टमंडळाने भोसरीचे उपअभियंता एस. एस. क्षीरसागर यांना निवेदन दिले. त्यावेळी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, संजय जगताप, माधव निर्लेकर, महेश पंडित आदी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांच्याशीही चर्चा झाली.

मोहननगरमधील विद्युत रोहित्रावर भार अधिक असल्यामुळे उच्च दाब वाहिनीवर ताण येतो आणि त्यामुळे वारंवार समस्या येत आहेत. मोहननगर परिसरात वीजपुरवठा सतत खंडित होत आहे. विद्युत रोहित्राच्या जागेवर झाड, झुडपे आणि गवत वाढलेले आहे. या परिसराचा समावेश भोसरी विभागात नवीन जोडल्यामुळे कर्मचाऱ्यांची आणि शिडी गाडीची संख्या अपुरी आहे, ज्यामुळे कर्मचारी वेळेवर पोहोचू शकत नाहीत. लघुदाब वाहिनी (एलटी) व फीडर बॉक्स यांचा सर्व्हे करण्याची गरज आहे.


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046